REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 12 | ISSUE - 10 | JULY - 2023

# महिलांच्या उन्नतीसाठी शिक्षणाची आवश्यकता

प्रा.डॉ. सुकेशिनी अंकुश जानराव
कॉलेज ऑफ एज्युकेशन, घारगाव, ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर.

**प्रस्तावना -**



समाजात स्त्रीच्याबाबतीत समानतेचा दृष्टिकोण अपेक्षेप्रमाणे विकसित होऊ शकला नाही. ही खेदाची बाब आहे. आजही मुलीचा जन्म आनंदाने स्वीकारला जात नाही. निर्णय प्रक्रियेत स्त्रीला फारसे स्थान दिले जात नाही. तिच्या श्रमाची गणना अनुत्पादक श्रमामध्ये होते. देशातील विविध वृत्तपत्रे व चित्रवाहिन्या पाहिल्यास त्यामध्ये स्त्रियांवरील अत्याचारांची उदाहरणे मोठ्या प्रमाणावर पाहावयास मिळतात. या परिस्थितीचा विचार करता महिलांचे सक्षमीकरण व स्त्रियांविषयीची समाजाची मानसिकता बदलणे ही काळाची गरज असून त्यादृष्टीने प्रामाणिक व सामूहिक प्रयत्नांची नितांत गरज आहे. येथे महिलांच्या सक्षमीकरणाचा एक मार्ग, प्रयत्न म्हणून 'शिक्षण' या घटकाचा विचार करता येतो.

भारताने स्त्री सक्षमीकरणाच्या संदर्भात सातत्याने प्रयत्न केले आहेत.

1. स्त्रियांवरील अत्याचार दूर करण्यासाठी सरकारने 1990 साली स्त्री हक्क आयोगाची स्थापना केली.
2. महाराष्ट्र सरकारने 1993 साली राज्य महिला आयोगाची स्थापना केली.
3. पुढे 1994 चे महिला धोरण जाहीर करून महिलांच्या सर्वांगीण विकासाचा विचार त्यात प्रकर्षाने मांडला. 4. राजकारण, शासकीय सेवांमध्ये 30% आरक्षण.
5. स्त्रियांना मालमत्तेत समान अधिकार.
6. इ. स. 2000 साली महाराष्ट्र शासनाने निर्णय घेऊन शाळेच्या दाखल्यावर विद्यार्थ्यांच्या वडिलांच्या नावाबरोबर आईचे नाव लावणे बंधनकारक केले.

वरील शासनाचे प्रयत्नही स्त्री सक्षमीकरणासंदर्भातील प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे स्त्रीशिक्षणासंबंधित होते. याशिवाय राज्यघटनेतील 16, 39 व 45 या कलमानुसार महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी महिला शिक्षणावर भर देण्यात आला आहे. याशिवाय मुलींच्या शिक्षणासाठी काही शासकीय योजना सुरू केलेल्या आहेत.

**मुलीच्या शिक्षणविषयक विविध शासकीय योजना ः-**

- **मागासवर्गीय विद्यार्थिनींना विशेष शिष्यवृत्ती**
- **अनुसूचित जातिजमातीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृती**
- **सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजना**
- **मुलींना** 12 **वीपर्यंत मोफत शिक्षण**
- **अनु. जातिजमाती, भटक्या व विमुक्त जमातीच्या दारिद्र्यरेषेखालील मुलीना उपस्थिती भत्ता**
- **इयत्ता** 12 **वीपर्यंत मुलींना अहिल्याबाई होळकर मोफत प्रवास योजना**
- **मुलींसाठी स्वतंत्र सैनिकी शाळा**
- **पुस्तकपेढी**
- **शालेय पोषण आहार**
- **मुलींच्या उत्कृष्ट पटनोंदणीसाठी पुरस्कार**
- **मुलींच्या शिक्षणासाठी उत्कृष्ट कार्य करणाऱ्या महिला शिक्षकांना सावित्रीबाई फुले आदर्श पुरस्कार**
- **महिलाविषयक विशेष कार्य करणाऱ्या महिलांना सावित्रीबाई फुले पुरस्कार.**

**मागील शासकीय योजनांचा परिणाम हा निश्चितच स्त्रीशिक्षणाच्या संदर्भात अनुकूलच झालेला दिसतो. आज देशात** 6 **महिला विद्यापीठे आणि सुमारे** 1200 **महिला महाविद्यालये स्वतंत्रपणे महिला उच्च शिक्षणासाठी कार्यरत आहेत. उच्च शिक्षणातील मुलींचे प्रमाण** 1949 **साली** 9.35% **होते. स्वातंत्र्योत्तर काळात त्यात वाढ होऊन आज ते प्रमाण** 34.1% **झाले आहे. एक गोष्ट मात्र नक्की की मुलींचे शिक्षणाचे प्रमाण संख्यात्मक पातळीवर वाढले तरी गुणात्मक पातळीवर जेव्हा आपण विचार करतो तेव्हा लक्षात येते की, आज मुलींना जे उच्च शिक्षण दिले जाते त्याची गुणात्मक उपयुक्तता किती ? त्या शिक्षणाचा दर्जा काय ? या गोष्टीचा आपण जेव्हा गांभीर्याने विचार करतो तेव्हा लक्षात येते की, हे शिक्षण मोठ्या प्रमाणावर व्यवहारशून्य आणि त्यांना केवळ पदवी मिळवून देणार आहे. उच्च शिक्षण घेऊन मुलींनी उद्योजक, व्यापारी, व्यवस्थापक, प्रशासक, सरकारी किंवा खाजगी क्षेत्रातील नोकरी करावी अशी अपेक्षा आहे. पण प्रत्यक्षात मात्र रोजगारात असलेल्या महिलांचे प्रमाण अगदीच अल्प आहे. यामुळेच स्त्री शिक्षणाच्या उद्दिष्टांच्या साध्यसंदर्भात मोठे प्रश्नचिन्ह उभे राहते.**

**कोठारी आयोगाने स्त्रीशिक्षणाच्या संदर्भात म्हटल्याप्रमाणे आपल्या मानवी संपत्तीच्या संपूर्ण विकासासाठी, गृहसुधारण्यासाठी आणि बाल्यावस्थेतील अत्यंत संस्कारक्षम वयात मुलांना चांगल्या पद्धतीने घडविण्यासाठी स्त्रियांना दिले जाणारे शिक्षण से पुरुषांच्या शिक्षणापेक्षा महत्त्वाचे आहे. मुलींना शिक्षण देताना हाच दृष्टिकोण डोळ्यासमोर ठेवला पाहिजे. परंतु वस्तुस्थिती वेगळी आहे. स्त्री शिक्षणाकडे मग ते प्राथमिक, माध्यमिक, महाविद्यालयीन वा व्यावसायिक असो समाजाच्या अभिवृत्तीत अपेक्षेप्रमाणे अजूनही बदल झालेला नाही. परिणामी, सर्वच स्तरांवर स्त्रीशिक्षणाचे प्रमाण अपेक्षेप्रमाणे दिसत नाही. उलट हे शिक्षण अर्धवट सोडून जाणारे, घेतलेल्या शिक्षणाचा उपयोग न करणाऱ्या स्त्रीचे प्रमाण खूप आहे. याला खालील घटक कारणीभूत आहेत.**

- **बदलत्या परिस्थितीशी न जुळणारे अभ्यासक्रम**
- **शासनाच्या भरीव धोरणाचा अभाव**
- **पालकांची स्त्री शिक्षणाकडे पाहण्याची उदासीनता**
- **शिक्षणापेक्षा हुंड्यावर खर्च करण्यावर पालकांचा भर**
- **नोकऱ्यांमध्ये सुरक्षितता नसणे**

- शिक्षण सुरू असतानाच विवाह होणे
- सनातन रूढी परंपराचे वर्चस्व
- नोकरी न मिळाल्यामुळे झालेला अपेक्षाभंग
- मुलांच्या संगोपनाची जबाबदारी मुलीवरच
- कुटुंबाचे दारिद्र्य.

वरील घटकांवर मात करण्यासाठी व मुलींच्या शिक्षणाच्या माध्यमातून एक व्यक्ती म्हणून आत्मविश्वासाने जीवनाला सामोरे जाण्याची दृष्टी आणि आत्मसन्मानाने जीवन जगण्याची कला मुलींमध्ये रुजवण्यासाठी शिक्षणामध्ये काही बदल करणे गरजेचे वाटते. या बदलाचे स्वरूप खालीलप्रमाणे करता येईल.

**महिलांच्या उच्च शिक्षणाकडे पाहण्याच्या दृष्टिकोणात बदल :** सामान्यपणे महिलांचा उच्च शिक्षणाचा पारंपरिक दृष्टिकोण पदवी मिळवणे हाच आहे. आज बदलत्या परिस्थितीनुसार त्यात बदल केला पाहिजे. आज पदवी शिक्षणाबरोबरच उपयोजित स्वरूपाचे व्यावसायिक अभ्यासक्रम शिकविणे गरजेचे झाले आहे. त्यामुळे महिला स्वतःच्या पायावर उभ्या राहू शकतील. पदवी शिक्षणक्रमात आधुनिक तंत्रज्ञान व माहिती देणारे शिक्षण समाविष्ट करणे आवश्यक आहे. असे शिक्षण महिलांना स्वावलंबी व स्वयंपूर्ण करू शकेल.

**स्त्रीशिक्षणासाठी एकात्म स्वरूपात सर्व स्तरांतून प्रयत्न -** महिलांच्या उच्च शिक्षणासाठी केंद्र व राज्य सरकार आणि खाजगी शिक्षणसंस्था प्रयत्नशील आहेत. स्त्रीशिक्षणासाठी होणारे हे प्रयत्न स्वतंत्ररित्या होण्यापेक्षा त्यामध्ये एकात्म स्वरूप असावे. पालक, शिक्षक, सामाजिक संस्था प्रशासन असे सर्व स्तरांतून एकदाच आघाडी उघडून प्रयत्न करावेत.

**स्त्रीशिक्षणासंदर्भात केलेल्या शिफारशींची काटेकोरपणे अंमलबजावणी:-** स्त्री संदर्भातील अथवा इतर समित्यांनी / आयोगांनी स्त्रीशिक्षणविषयक ज्या शिफारशी केलेल्या आहेत त्यांची अंमलबजावणी काटेकोरपणे होणे गरजेचे आहे. या शिफारशीची अजूनही प्रामाणिकपणे 100% अंमलबजावणी झालेली आहे असे दिसत नाही?

**स्त्रियांनी विविध अभ्यासक्रमांना आत्मनिर्भर होण्यासाठी प्रवेश घ्यावा:-** स्त्रियांनी केवळ प्रतिष्ठेसाठी वा पदवीसाठी शिक्षण न घेता आत्मनिर्भर होण्याच्या दृष्टीने केवळ काहीच अभ्यासक्रमाची निवड न करता विविध अभ्यासक्रमांचा शोध घेऊन तो पूर्ण करावा.

कला, वाणिज्य, विज्ञान याबरोबरच गृहविज्ञान, गृह अर्थशास्त्र, नर्सिंग, कायदा, व्यवस्थापन, शिक्षणशास्त्र, अभियांत्रिकी, वैद्यकीय, औषधनिर्माण, तांत्रिक व व्यावसायिक शिक्षण, पोलीस, गुप्तचर विभाग, सागरी विज्ञान, संरक्षण अशा विविध अभ्यासक्रमांना प्रवेश घेऊन स्त्रीने आत्मनिर्भर होणे गरजेचे आहे.

**जागतिकीकरणास सामोरे जाण्यास स्त्रीशिक्षणाची तयारी:-** महिलांना उच्च शिक्षण देताना येणाऱ्या शतकातील जागतिकीकरण, खाजगीकरण, उदारीकरण यांच्या आव्हानांना सामोरे जाण्याचे कौशल्य, क्षमता विकसित करणारे शिक्षण असणे गरजेचे आहे. यासाठी संगणक, माहिती-तंत्रज्ञान, संप्रेषण शास्त्र, व्यवस्थापन इ. स्वरूपाचे शिक्षण हे स्त्रीशिक्षणामध्ये असावे..

**स्त्रियांची कायदे, प्रशासन याबद्दलची जागरूकता वाढविणे :-** ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगरपरिषद, महानगरपालिका इ. ठिकाणी महिलांसाठी राखीव मतदार संघ निर्माण केले आहेत. बऱ्याच प्रमाणात महिला त्यात प्रतिनिधित्व करत आहेत पण हे घडत असताना असे लक्षात येते की, बऱ्याच महिलांना त्या संबंधीचे कायदे, नियम, प्रशासन याबद्दल माहिती नसते. त्यासाठी पदवीपर्यंतच्या अभ्यासक्रमात महिलांविषयक कायदे, भारतीय राज्यघटना आणि प्रशासनासाठी आवश्यक असणाऱ्या कायद्यावर आधारित अभ्यासक्रम सुरू करणे गरजेचे आहे.

**स्त्रीशिक्षण गरजाधिष्ठित असावे :-** महिलांना शिक्षण देताना त्यांच्या गरजा कोणत्या? महिला विकास योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी नेमके कोणते शिक्षण आवश्यक आहे अणि असे शिक्षण आपली प्रचलित शिक्षण पद्धती देते का? जे शिक्षण स्त्री गरजाधिष्ठित म्हणून दिले जात आहे ते खरोखर प्रत्यक्षात स्त्रियांच्या किती गरजा पूर्ण करते या संदर्भात या अभ्यासक्रमाचे साकारिक मूल्यमापन करणे गरजेचे आहे, या संदर्भात शास्त्रीय पद्धतीने संशोधन हाती घेता येईल.

**स्त्रियांना संरक्षणासाठी व आरोग्यासाठी शिक्षण :-** स्त्रियांवर वाढणारे अत्याचार, होणारा अन्याय याचा विचार करता त्याचा प्रतिकार करण्यासाठी त्यांना कवायती, ज्युडो-कराटे, स्वसंरक्षण विद्या शिकविणे गरजेचे आहे. तसेच स्त्रियांच्या आरोग्याची होणारी हेळसांड लक्षात घेता त्यांना आरोग्य शिक्षण, आहारशास्त्र, योगविद्या इ. शिक्षण देणे गरजेचे वाटते.

**स्त्रीशिक्षणासाठी शासनाचे भरीव धोरण असावे :-** शासनाने स्त्रियांच्या शिक्षणासाठी राजकीय, सामाजिक स्तरावर विविध धोरणे आखून त्यांची अंमलबजावणी करावी. स्त्रीशिक्षणासाठी भरीव आर्थिक तरतूद करावी. त्यांच्या नोकरीची हमी द्यावी. स्त्रियांना विविध आघाड्यांवर पुढे येण्यासाठी आवश्यक संधी उपलब्ध करून द्यावीत.

**स्त्री शिक्षणासंदर्भात संशोधन :-** शैक्षणिक संशोधन हे स्त्रीशिक्षण या क्षेत्रातही संख्यात्मक व गुणात्मक स्वरूपात होणे गरजेचे आहे. या शिक्षणाचे ध्येय व त्यांची साध्यता, अभ्यासक्रम, अध्यापन पद्धती, व्यवस्थापन, मूल्यमापन या संदर्भात संशोधन हाती घेऊन त्यांच्या निष्कर्षांचा उपयोग स्त्रियांच्या विकासासाठी केला जावा.

वरील सर्व बदल प्रत्यक्षात झाल्यास स्त्रियांचे समाजातील स्थान, स्वरूप पार बदलून जाईल यासाठी प्रत्यक्ष शाळेमध्ये, शिक्षकाला व शालेय धोरणात काही बदल करणेही गरजेचे वाटते ज्यातून स्त्रियांच्या विकासाला जेथून सुरुवात होते तो शालेय शिक्षणाचा पाया पक्का होईल.

शाळा हे समाजपरिवर्तनाचे केंद्र आहे. शाळेमध्ये मुलगा-मुलगी दोघे समान हा दृष्टिकोण रुजविण्यासाठी पोषक असे शालेय वातावरण निर्माण झाले पाहिजे. त्यात खालील बाबींचा समावेश असावा.

* शाळेत येण्यास मुलींना आनंद वाटेल असे उत्साहाचे व आनंदाचे वातावरण असावे.
* शाळेच्या भिंतीव फलकावर योग्य ती घोषवाक्ये, गीते व चित्रे लावून स्त्रीशिक्षणास अनुकूल वातावरण तयार करणे.
* वर्गाचे प्रतिनिधित्व मुलांप्रमाणे मुलींनाही द्यावे..
* शाळेतील प्रत्येक कार्यक्रमात मुला-मुलींना समान संधी द्यावी...
* वर्गातील बैठक व्यवस्था, वर्ग सुशोभन, कवायत व परिपाठ यामध्ये मुलींना अधिकाधिक संधी द्यावी.
* मुलींना धीट, निर्भय व चौकस होण्यास प्रोत्साहन द्यावे.
* मुलांप्रमाणेच मुलींसाठी देखील क्रीडास्पर्धांचे आयोजन करावे.
* मुलींमध्ये सामाजिक कौशल्यांचा विकास करून आत्मविश्वास निर्माण करावा.

* **मुलींची शिक्षण घेताना कुठल्याही प्रकारे मानसिक कुचंबणा होणार नाही यासाठी शिक्षकाने व शाळेने सजग असावे.**
* **मुलींच्या शालेय प्रगतीला प्रोत्साहन देणारी पारितोषिके जाहीर करावीत.**

**समारोप :-**

**वरील शालेय परिस्थिती ही मुलींना शिक्षणासाठी हवी असणारी संधी उपलब्ध करून देईल व या संधीचे सोने करून प्रत्येक मुलगी एक सशक्त, सबल, आत्मनिर्भर व्यक्ती म्हणून आपली ओळख तयार करून सन्मानाने या जगात वावरू शकेल.**